लोकमत

# 'सांगलीतील विद्यापीठ उपकेंद्राबाबत मार्चला बैठक घेऊ : शिर्के

**कोल्हापूर** : सांगली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र खानापूर याठिकाणी करावे, अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेने गुरुवारी केली. त्याबाबतचे निवेदन या सभेच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना दिले. त्यावर याबाबत मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात सविस्तर बैठक घेण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.सांगली जिल्ह्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र खानापूर येथे गेल्या दोन वर्षांपूर्वी मंजूर झाले. त्यासाठी येथील जागा पाहणीदेखील विद्यापीठाच्या समितीने करून त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे. मात्र, त्याबाबत अद्याप विद्यापीठ प्रशासनाकडून पुढील कार्यवाही झालेली नाही. उपकेंद्र खानापूर येथे झाल्यास आसपासच्या आटपाडी, कवठेमहांकाळ, जत, कडेगाव आदी सर्व तालुक्यांतील विद्यार्थ्यांसाठी ते सोयीस्कर ठरणार आहे. सोयी-सुविधांच्यादृष्टीने खानापूरमधील उपलब्ध जागा योग्य असल्याने त्याच ठिकाणी उपकेंद्र व्हावे. याबाबत पुढील कार्यवाहीचा निर्णय घेण्यापूर्वी अखिल भारतीय किसान सभेच्या शिष्टमंडळासमवेत चर्चा करावी, अशी मागणी या निवेदनाव्दारे करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी 'किसान सभे'चे जिल्हाध्यक्ष उमेश देशमुख, संघटक गोपीनाथ सूर्यवंशी, आदी उपस्थित होते.

2 6 FEB 2021

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बदलणारे तंत्रज्ञान माध्यमांपुढचे आव्हान

## सम्राट फडणीस ; सचिन वायकुळेंच्या पुस्तकाचे प्रकाशन



**कोल्हापूर : सचिन वायकुळे लिखित 'पत्रकारिता शोध आणि बोध' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी 'सकाळ' पुणे आवृत्तीचे संपादक सम्राट फडणीस. शेजारी भाग्यश्री कासोटे, प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे, श्री. वायकुळे, उपायुक्त विनायक औंधकर, प्रा. डॉ. शिवाजी जाधव.**

**कोल्हापूर, ता. २५ :** पत्रकारितेची विश्वासार्हता टिकवून झपाट्याने बदलत चाललेले तंत्रज्ञान हे माध्यमांपुढचे आव्हान असेल. फेक न्यूज हा मोठा धोका पुढे असून, विश्वासार्हता टिकवून बदल स्वीकारले तरच पत्रकारितेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास 'सकाळ' पुणे आवृत्तीचे संपादक सम्राट फडणीस यांनी आज येथे व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठात पत्रकार सचिन वायकुळे लिखित 'पत्रकारिता शोध आणि बोध' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. साहित्यिक प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहात कार्यक्रम झाला.

श्री. फडणीस म्हणाले, ''पत्रकारितेच्या क्षेत्राबद्दल मूळ पत्रकारिता करणाऱ्या लोकांनी लिहिणे महत्त्वाची गोष्ट आहे. चांगला पत्रकार बनायचं असेल तर गाव ते जग असा परिघ ठेवणे गरजेचे आहे. पत्रकारिता हा प्रश्न समजून घ्यायचा अन् उत्तर शोधायचा व्यवसाय आहे.''

डॉ. लवटे म्हणाले, ''पत्रकारिता हा फक्त सिद्धांत नाही, तर तो व्यवहार असतो; परंतु तत्त्वांना धरून पत्रकारितेचा लोकव्यवहार व्हायला हवा. पत्रकारिता करताना आलेल्या प्रश्नांचा शोध आणि बोध वायकुळे यांच्या पुस्तकात आहे.''

या वेळी उपायुक्त विनायक औंधकर, डॉ. रत्नाकर पंडित, सांगली-मिरज- कुपवाड महापालिकेचे आरोग्याधिकारी डॉ. रवींद्र ताटे, प्रा. डॉ. शिवाजी जाधव, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. श्रीहरी देशपांडे, भाग्यश्री कासोटे, पत्रकारिता विभागाचे विद्यार्थी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2021 लोकमत

# पदवी, पदव्युत्तरसाठी पन्नास गुणांचा पेपर

## वेळापत्रक निश्चितीसाठी समिती स्थापन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी २५ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा ५० गुणांचा पेपर (प्रश्नपत्रिका) करण्याचा निर्णय गुरुवारी घेतला. ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने या परीक्षा घेण्यात येणार आहेत. परीक्षांचे वेळापत्रक, त्या घेण्याची जबाबदारी निश्चिती, आदींसाठी विद्या परिषदेतील सदस्य डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

विद्यापीठामध्ये विद्या परिषदेच्या बैठकीत परीक्षांबाबत निर्णय घेण्यात आला. कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर सत्रातील एकूण ६२१ परीक्षा मार्च-एप्रिल दरम्यान होणार आहेत. त्यात पहिल्या सत्राच्या परीक्षांची (पान ८ वर)



शिवाजी विद्यापीठाचा निर्णय

### समितीची पुढील आठवड्यात बैठक

- या परीक्षांच्या वेळापत्रक निश्चितीसाठी नियुक्त केलेल्या गुळवणी समितीत आठ सदस्याचा समावेश आहे. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विविध सत्रांतील परीक्षा घेण्याच्या जबाबदारीसह अन्य निर्णय ही समिती घेणार आहे.
- समितीची पहिली बैठक पुढील आठवड्यात घेण्याचे नियोजन असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

## पदवी, पदव्युत्तरसाठी पन्नास गुणांचा पेपर

(पान १ वरून) संख्या शंभर आहे. सुमारे दोन लाख विद्यार्थी या परीक्षांसाठी नोंदणी करतील. कोरोनामुळे विद्यापीठाने २० टक्के अभ्यासक्रम कमी केला आहे. त्यामुळे या परीक्षा ८० टक्के अभ्यासक्रमावर घेतल्या जाणार आहेत. त्यासाठी ५० गुणांच्या परीक्षेसाठी एक तासाची वेळ असणार आहे.

इंजिनिअरिंग, फार्मसी, लॉ, मॅनेजमेंट, शिक्षणशास्त्र, आर्किटेक्चर या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होतील. त्यासाठी अग्रणी महाविद्यालयांची नियुक्ती करून त्यांच्या माध्यमातून या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. त्याला विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास

पकडले. एकाने आपल्या खाजगी जागेत मोबाइल टॉवर उभारण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मागितले होते.

तरूण भारत

# परीक्षा ऑफलाईन, ऑनलाईन घेण्यास मान्यता

## विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षा ऑफलाईन आणि ऑनलाईन घेण्यास मान्यता देण्यात आली. याचे नियोजन करण्यासंदर्भात एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या मार्गदर्शनाखाली परीक्षांचे नियोजन करण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे विद्यापीठ परीक्षांचा मार्ग मोकळा झाला आहे.

१५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू केली आहेत. परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. डॉ. कणसे समितीने ८० टक्के अभ्यासक्रमाच्या आधारे ५० गुणांसाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेण्याचा प्रस्ताव विद्या परिषदेला सादर केला होता. या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. यामध्ये पाचव्या सेमिस्टरची विद्यापीठ पातळीवर २२ मार्चपासून परीक्षा घेण्यात येणार आहे. तर पदवी प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर एप्रिल महिन्यापासून घेण्यात येतील. किती विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईनसाठी व किती विद्यार्थ्यांनी ऑफलाईनसाठी भरला आहे, याचा विचार करून परीक्षा घेतल्या जातील. ज्या महाविद्यालयांना ऑनलाईन परीक्षा घेणे शक्य नसल्यास त्यांनी ऑफलाईन परीक्षा घ्यावयाची आहे.

तरूण भारत

# नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव आज सादर होणार

## व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाकडे बृहत आराखड्यातील बिंदूंची पुर्तता करीत १७ नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठीचे प्रस्ताव संस्थाचालकांनी पाठवले आहेत. या प्रस्तावाची स्कुटणी करून हे प्रस्ताव शासनाकडे आज (दि. २६) रोजी सादर करण्यास व्यवस्थापन बैठकीत मान्यत देण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

वार्षिक आणि पंचवार्षिक बृहत आराखड्यातील बिंदूंची पुर्तता करीत



१७ नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाकडे आले आहेत. हे प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यासाठीची २८ फेब्रुवारी ही अंतिम मुदत आहे. त्यामुळे महाविद्यालयांच्या प्रस्तावांची स्कुटनी करून, निर्णय घेण्यासाठी तातडीने व्यवस्थापन परिषदेची बैठक घेण्यात आली. प्रस्तावात पारंपारिक, व्यवसायिक, नवीन अभ्यासक्रम, नवीन तुकड्यांचा समावेश आहे.

सकाळ

» क गट टी- २० क्रिकेट स्पर्धा

# शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ, 'मालती पाटील' उपांत्य फेरीत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित क गट टी- २० क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ आणि (कै.) सौ. मालती पाटील क्रिकेट ॲकॅडमीने उपांत्य फेरीत प्रवेश केला. राजाराम महाविद्यालय मैदानावर सामने झाले.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ८ बाद १८२ धावा केल्या. विनायक शिंदे ५४, रमेश ढोणुक्षे ४८ व विक्रम कोठावळे ३२ धावा केल्या. एस. पी. ॲकॅडमीकडून एकलव्य बोंगाळे व सुनिल यतीमकर यांनी प्रत्येकी २, सिध्देश गावडे, प्रथमेश गुरव, विवेक बोंगाळे व तेजस गुरव यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. एस. पी. ॲकॅडमीने २० षटकांत ९ बाद १४२ धावा केल्या. यामध्ये विवेक बोंगाळे ४४, औदुंबर कुंद्रे २८, प्रथमेश गुरव १४, समीर चौगुले व विशाल कांबळे यांनी प्रत्येकी १३ धावा केल्या. कर्मचारी संघाने विश्वनाथ वरूटेने ३, रमेश ढोणुक्षे व सागर पोवार यांनी प्रत्येकी २, शशिकांत दाभाडे व योगेश साळवी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

टोपच्या मंगलमूर्ती क्रिकेट ॲकॅडमी आणि कै. सौ. मालती पाटील क्रिकेट ॲकॅडमी क मध्ये झालेल्या सामन्यात पाटील ॲकॅडमी क ने २ विकेटनी विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मंगलमूर्ती ॲकॅडमीने २० षटकांत ७ बाद ११३ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना पाटील ॲकॅडमी क ने १९.४ षटकांत ८ बाद ११४ धावा केल्या. यामध्ये संतोष डोकरे नाबाद २६, विनीत बागल नाबाद २४ व साहील भोसले १३ धावा केल्या.